# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी परिसर,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ४०००९८.
**Email** - dboee@exam.mu.ac.in

क्र.DBOEE/ICF/2024-25/1263 दिनांक 01-03-2025

परिपत्रक : -

**विषय: प्रथम वर्ष NEP पदवी (सत्र १) गुण सादर करण्याच्या अंतिम मुदतीत वाढ**

**संदर्भ : १) परिपत्रक क्र. DBOEE/ICF/2024-25/1256, दिनांक 31-01-2025**
**२) परिपत्रक क्र. DBOEE/ICF/2024-25/1259, दिनांक 10-02-2025**
**३) परिपत्रक क्र. DBOEE/ICF/2024-25/1260, दिनांक 15-02-2025**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य, तसेच समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे आणि विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे यांना कळविण्यात येते की, प्रथम वर्ष NEP पदवी (सत्र १) अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे मूल्यांकन पूर्ण करून, त्या परीक्षांचे **Theory / Practical / Internal** इत्यादी गुण **ई-समर्थ (E-Samarth) पोर्टलद्वारे** विद्यापीठाकडे **दिनांक १० फेब्रुवारी २०२५** पर्यंत सादर करण्यास उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्रमांक १ नुसार कळविण्यात आले होते.

तथापि, **१० फेब्रुवारी २०२५ पर्यंत अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे मुदतवाढ देऊन ती १४ फेब्रुवारी २०२५ करण्यात आली होती** (संदर्भ क्रमांक १). त्यानंतर **पुन्हा मुदतवाढ देऊन अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०२५** निश्चित करण्यात आली होती (संदर्भ क्रमांक ३). मात्र, अद्यापही महाविद्यालयांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने **सदर अंतिम मुदत आता ५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व महाविद्यालयांनी जबाबदारि पूर्वक नोंद घ्यावी. यानंतरही महाविद्यालयांकडून गुणांची नोंद पोर्टलवर झाली नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे निकाल राखीव राहिल्यास त्यासाठी महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील. महाविद्यालयांनी ही सूचना गांभीर्याने घेत निर्धारित वेळेत आवश्यक कार्यवाही करावी.

**(डॉ. पुजा रौंदळे)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रती,
मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, महाविद्यालयांचे प्राचार्य समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे

प्रत माहितीस्तव :
१) प्रभारी संचालक, DICT
२) उपकुलसचिव निकाल कक्ष, परीक्षा विभाग